**Savitribai Phule Pune University**
(Formerly University of Pune)
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

परिपत्रक क्र. ३३८/2026

दिनांक: ३०/ ०९ /2026

शैक्षणिक वर्ष 2026-27 च्या प्रथम सत्रांच्या परीक्षांचे नियोजन परीक्षा विभागात सुरू आहे. प्रत्येक शैक्षणिक वर्षात ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत प्रथम सत्राच्या तर एप्रिल ते जून या कालावधीत द्‌वितीय सत्राच्या परीक्षा घेण्यात येतात. परीक्षा आवेदनपत्र (Examination form) भरणे, हॉल तिकीट generate करणे व प्रात्यक्षिक परीक्षांसाठी summary generate करणे ही प्रक्रिया साधारणपणे लेखी परीक्षेच्या आठवडाभर आधीपर्यंत विविध कारणांनी चालत असते.

NEP Pattern अंतर्गत व CBCS Pattern अंतर्गत continuous and comprehensive evaluation सतत सातत्यपूर्ण अंतर्गत मूल्यमापन याचा अंतर्भाव आहे व Insem परीक्षांचा आणि Internal परीक्षांचा देखील अंतर्भाव आहे. सदर परीक्षा महाविद्‌यालयीन स्तरावर प्रथम सत्रासाठी ऑगस्ट ते ऑक्टोबर आणि द्‌वितीय सत्रासाठी मार्च ते एप्रिल या कालावधीत घेतल्या जातात. या कालावधीत परीक्षा घेतल्यानंतर विद्‌यार्थ्यांचे गुण भरण्यासाठी हॉल तिकीट तयार होऊन सीट नंबर येईपर्यंत प्रतीक्षा करावी लागते.

निकाल जाहीर करताना परीक्षा विभाग सीट नंबर सोबत Permanent Registration Number (PRN) च्या आधारेच निकाल प्रक्रिया करीत असते. म्हणून अंतर्गत मूल्यमापन जसे की अंतर्गत परीक्षा, Insem परीक्षा, प्रात्यक्षिक, मौखिक, Dessertation, Sessional Viva व इतर सर्व प्रकारच्या परीक्षा ज्या महाविद्‌यालयीन स्तरावर घेतल्या जातात, अशा परीक्षांच्या marks entry ही PRN प्रमाणे घेतल्यास वेळेत होऊ शकेल, जेणेकरून यात ज्या महाविद्‌यालयांचे marks भरायचे राहिले असतील किंवा काही ठिकाणी चुका झाल्या असतील किंवा काही ठिकाणी links उपलब्ध झाल्या नसतील, batches create करावयाच्या असतील तर त्यावेळीच लेखी परीक्षेपूर्वीच करता येतील. यामुळे सत्राच्या निकाल प्रक्रियेतही वेळेची बचत हईल.

सबब या परिपत्रकाद्‌वारे असे कळिवण्यात येते की, सर्व प्रकारच्या अंतर्गत परीक्षा तसेच प्रात्यक्षिक, मौखिक व तत्सम परीक्षा यांचे मूल्यमापन हे PRN नुसार करण्यात येईल. Internal Marks System मध्ये विद्‌यार्थ्यांच्या नावापुढे PRN उपलब्ध करून देण्यात येईल. PRN ची यादी महाविद्‌यालयांकडे उपलब्ध आहेच. आवश्यकता असल्यास पुनश्च एकदा ती त्यांना उपलब्ध करून देण्यात येईल व सर्व गुणदान (Mark Entry) हे PRN प्रमाणे करावे असे सूचित करण्यात येत आहे. या शैक्षणिक वर्षापासून ही प्रक्रिया चालू राहील.

(डॉ. राजेंद्र तलवारे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ